दैनिक प्रीतिसंगम
मंगळवार दि.१० नोव्हेंबर २०२६

येरळवाडी धरणासंदर्भातील अडीअडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करू

आ.रोहित पवार

वडूज/प्रतिनिधी : –

खटाव तालुक्यातील येरळवाडी धरणासंदर्भात असणाऱ्या शेतकरी व ग्रामस्थांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातील, असे ठोस प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे युवानेते आ. रोहितदादा पवार यांनी केले.

येरळवाडी येथील तलाव पाहणी प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी आमदार सुनील भोईर,राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश युवक सरचिटणीस अभयदादा जगताप, राष्ट्रीय काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष रणजीतभैय्या देशमुख, मायणी बँकेचे अध्यक्ष सुरेंद्रदादा गुदगे, मठाधिपती विठ्ठलस्वामी महाराज, माजी उपसभापती नाना पुजारी, मकरंद बोडके, प्रा. सदाशिव खाडे, प्रा. कविता म्हेत्रे, रेश्मा तानवडे, सुनील फडतरे, शकील



मुजावर, डॉ. महेश गुरव, आण्णासाहेब काकडे, डॉ. प्रशांत गोडसे, डॉ. रोहित गोडसे, प्रतापराव देशमुख, अजित पवार, जयकुमार बागल, आण्णासाहेब मगर, विजय शेटे, ड. नितीन गोडसे आदि उपस्थित होते.

आ. पवार म्हणाले, वनखात्याच्या अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे येरळवाडी तलाव वनक्षेत्रात गेला आहे. तो बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले जातील. या भागातील जमीन सातबाऱ्यावर असणारे तारळी, टेंभू योजनेचे सिक्के काढण्यासाठी निवृत्त अधिकाऱ्या मार्फत अभ्यास केला जाईल. जिल्हाधिकारी, फॉरेस्ट व पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांसी चर्चा करून जनावरांच्या चारा पिकासाठी पाणी उपसा करून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल. दुष्काळी परिस्थितीत तलावातील गाळ काढला जाणार आहे. त्याचा शेतकऱ्यांनी फायदा घ्यावा. शेती पाण्याबाबत खटाव तालुक्यावर अन्याय सहन केला जाणार नाही. भविष्यात आपले सरकार येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरून न जाता परिस्थितीला सामोरे जाण्याची मानसिकता ठेवावी.

अभय जगताप म्हणाले, लक्ष्मी पूजना दिवशी रात्रीची वेळ असूनसुद्धा कार्यकर्ते व शेतकऱ्यांनी केलेल्या गर्दीमुळे पाण्याची किती गरज आहे हे लक्षात येते.येरळवाडी धरण वन विभागाच्या अखत्यारीतून काढावे. एरिया कमी झाल्यामुळे दुसऱ्या धरणातून पाणी सोडण्यात यावे. खटावच्या हिश्याचे पाणी खटावला मिळावे. माण मध्ये आंधळी धरण परिसरातच पाणी मुरत असल्यामुळे उर्वरित भागात लोकप्रतिबद्दल तीव्र नाराजी आहे. यावेळी नाना पुजारी, डॉ. प्रशांत गोडसे, बाळासो पोळ यांचीही मनोगते झाली. योगेश जाधव यांनी प्रास्ताविक केले.

पाटणमधील तीन रस्त्यांसाठी ४० कोटींचा निधी

केंद्रीय मार्ग निधीतून ४३.३५ किलोमीटर रस्त्यांची सुधारणा

पाटण/प्रतिनिधी : –

पाटण विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सक्षम करण्यासाठी तीन प्रमुख जिल्हा मार्गांच्या सुधारणेसाठी केंद्रीय मार्ग निधीतून (सीआरएफ) ४० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यामुळे मतदारसंघातील सुमारे ४३.३५ किलोमीटर रस्त्यांची सुधारणा होणार असून, पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

या निधीतून तारळे विभागातील काटेवाडी फाटा-आवर्डे-मालोशी



(एमडीआर-१३४), मारुलहवेली विभागातील निसरे-मारुल-गुढे-काळगाव-भुरभुशी (एमडीआर-५४) आणि त्रिपुडी-मुळगाव-कवरवाडी-नेरळे-गुंजाळी-लेंढोरी-मणेरी-चिरंबे-काढोली-चाफेर-रिसवड-ढोकावळे (एमडीआर-१२९) या रस्त्यांचा समावेश आहे.

या मार्गांवरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने रस्त्यांची सुधारणा करण्याची मागणी होती. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्ताव तयार केला होता. देसाई यांनी केंद्राकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी निधी मंजूर झाल्याचे केंद्र सरकारच्या संबंधित विभागाने राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्राद्वारे कळविले आहे. मंजुरीनंतर देसाई यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निविदा प्रक्रिया पूर्ण करून रस्त्यांची कामे तातडीने सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

क्रांतीच्या विद्यार्थिनीची राष्ट्रीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड

ईश्वरपूर/प्रतिनिधी : –

पलूस तालुक्यातील कुंडल येथील क्रांती इंटरनॅशनल पब्लिक स्कुलची विद्यार्थीनी अनन्या राहुल पवार हिने अकोला येथे झालेल्या युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या विद्यमाने राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत पहिला क्रमांक पटकाविला.

अनन्या राहूल पवार ही क्रांती स्कूलमध्ये इयत्ता बारावी मध्ये सायन्स विभागात शिकत आहे. तिला कोच सुनिल खिलारे व क्रीडाशिक्षक वैभवराज चिपरे, नागेश धनवडे यांनी मार्गदर्शन केले. या कामगिरीमुळे तिची नागालँड येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशस्वी खेळाडूचे शाळेचे चेअरमन किरण तात्या लाड, सीईओ रणजित भैय्या लाड, प्राचार्या डॉ रूपाली शहा, व्यवस्थापक विजय जाधव, समन्वयक संदीप जाधव, व्हि जी एल अकॅडमीचे समन्वयक रोहन पवार, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.











येथील साडयांना मानाचे स्थान
पाडवा भाऊबीजेची उंचावते शान

नात्यांच्या उत्सवाची वस्त्रे !
प्रेम आणि आनंदाच्या धाग्यात विणलेल्या साड्या !


शहा ब्रदर्स
CLOTHING LLP

मेन रोड, इंदापूर, जि. पुणे. ☎ 223123
www.shahclothing.com

सुटिंग । शर्टिंग । रेडिमेडस् । इथेनिक वेअर & ड्रेस मटेरिअल
सिल्क साड्या । पैठणी । स्पेशल वेडींग कलेक्शन




श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या कार्याची माहिती



स्वामींचे भक्त संपूर्ण भारतभरातून अक्कलकोट येथे दर्शनासाठी येतात. काळानुरूप भक्त मंडळींच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होते आहे. १९८८ पासून आज पर्यंत स्वामी समर्थांच्या अन्नछत्र मंडळात अनेक वैशिष्ट्यपूर्ण बदल घडले आहेत. पण या सर्व भक्तमंडळींना अन्नपूर्णे सदा पूर्ण शंकर प्राण वल्लभे, ज्ञान वैराग्य सिध्यर्थं भिक्षान् देहीच पार्वती या श्लोकाची प्रचिती अन्नपूर्णेच्या रूपात देत, स्वामींच्या कृपा प्रसादाचा लाभ मिळवून दिला आणि अन्नदानाच्या या महाचळवळीचा पाया रचला तो श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासाच्यावतीने. १९८८ पासून अतिशय पुण्याचं पण तेवढंच आव्हानात्मक व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हे काम अक्कलकोट संस्थानच्या राजघराण्याचा वारसा लाभलेले संस्थापक अध्यक्ष सन्मा. श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कार्यकारी अध्यक्ष सन्मा. श्री. अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या कुशल नेतृत्वाखाली श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून अविरतपणे सुरू आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासच्या या स्वामी कार्यावर टाकलेला हा एक दृष्टिक्षेप..

वास्तविक, अक्कलकोट संस्थानच्या भोसले घराण्यावर श्री स्वामी समर्थ महाराजांची खास मर्जी होती आणि असीम कृपा होती. श्री स्वामी समर्थांच्या समकालीन त्यावेळेस श्रीमंत मालोजीराजे दुसरे हे गादीवर होते ते निस्सीम स्वामीभक्त होते. स्वामी भक्तीची परंपरा नंतरच्या काळात राजघराण्यात रुजत गेली आणि या राजघराण्याचा वारसा लाभलेले सन्मा.श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांचे करवी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची स्थापना करून परगांवच्या स्वामी भक्तांसाठी अन्नदान हे सर्वश्रेष्ठ असे स्वामी कार्य श्री स्वामी समर्थांनी सुरु केले. स्वामी सेवेचा ध्यास आणि अक्कलकोट येथे येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी या उद्देशाने, गुरूपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर सन १९८८ मध्ये



सन्माननिय श्री. जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे प. पू. श्री. मोहन पुजारी आणि आपल्या इतर सहकाऱ्यांच्या सहयोगाने, अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत या धर्मादाय न्यासाची मुहूर्तमेढ रोवली. अन्नछत्राच्या उभारणी वेळी संस्थापक अध्यक्ष सन्मा.श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर प्रथमतः ३ किलो तांदळाचा प्रसाद स्वामींना महानैवेद्य म्हणून दाखवला, भाविकांना महाप्रसाद दिला आणि अन्नछत्र मंडळाची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. या धर्मादाय संस्थेचे रजिस्ट्रेशन (नोंदणी) झाल्यानंतर, सार्वजनिक धर्मादाय न्यास अस्तित्वात आले.

कै. अंबुबाई सरदेशमुख या मातोश्रींनी उदार अंतःकरणाने वटवृक्ष मंदिराच्या उत्तर महाद्वारालगत स्वतःच्या जागेत अन्नछत्र सुरू करण्यास परवानगी दिली. सुरवातीला अगदी लहान स्वरूपात हे कार्य सुरू होते. पण दिवसेंदिवस स्वामी भक्तांची वाढणारी गर्दी लक्षात घेता, या धर्मादाय न्यासाने देवस्थानच्या दक्षिण बाजूस कै. वीरभद्र कोळळे यांच्या मालकीच्या जागेची रीतसर खरेदी करून, त्या जागेवर नियोजनपूर्वक मोठे पत्राशेड उभारून सन १९९४ मध्ये अन्नछत्राचा कार्य विस्तार केला. सध्याचे अन्नछत्र हे प्रशस्त आणि वातानुकूलित आहे. अनेक स्वामी भक्तांनी या पुण्यकार्यात सढळ हस्ते देणग्या दिल्या. देणग्यांचा ओघ ही वाढला आणि आजही तो सुरु आहे. सुरवातीच्या काळात एस.टी. महामंडळाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सढळ हाताने मदत करून या कार्यास हातभार लावला. तसेच सोलापूरचे कै. बाळासाहेब शिंदे व कै. शिवाजीराव पिसे महाराज यांनी





या कार्यासाठी खंबीर साथ दिली. त्याचप्रमाणे ॲड.मा. श्री. सुरेशचंद्र भोसले, पुणे आणि सन्मा. ॲड. श्री नितीनजी हबीब यांनी या स्वामी कार्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करीत मोलाची साथ दिली आहे.

स्वामी भक्तांचे व शहरवासी यांचे श्रध्देचे स्थान असलेल्या शमी विघ्नेश गणेशाची स्थापना १९९२ साली 'यात्रीभुवन' समोर शमीच्या विशाल वृक्षाखाली करून सुंदर असे मंदिर त्या ठिकाणी उभारलेले आहे. या गणेशाची नित्योपचार व पूजा होत असून येथे श्री गणेश जयंती व श्री गणेश चतुर्थी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

सर्व स्वामी सेवेकऱ्यांच्या सहकार्याने, अन्नछत्र मंडळाचे कार्य आजतागायत अविरतपणे सुरू आहे. आजमितीस श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात दररोज दोन्ही वेळेस १५ ते २० हजारांवर



स्वामीभक्त, महाप्रसादाचा लाभ घेऊन तृप्त होतात. उत्तम नियोजन, भक्तांच्या गर्दीचे सुयोग्य व्यवस्थापन, महाप्रसादासाठी गुणवत्तापूर्ण अन्नधान्याचा व भाजीपाल्याचा वापर करण्याची दक्षता घेतली जाते तसेच सर्व गुणवत्ता मानकांची काळजीपूर्वक अंमलबजावणी ही केली जाते. तसेच वॉटर सॉफ्टनर च्या माध्यमातून भक्तांना क्षार विरहित व आर.ओ. (ठज) चे पिण्याचे पाणी दिले जाते. दररोज केल्या जाणाऱ्या महाप्रसादात पोळी, मसालेभात, शिरा किंवा गव्हाची खीर, सांजा, आमटी, बटाटा-वांगी - काकडी भाजी, पालेभाज्या, पापड तर रात्री साधाभात, पोळी, भाजी, आमटी असे प्रसादाचे स्वरूप असते. एकादशीच्या दिवशी साबुदाणा खिचडी, दही, भगर, आमटी, खजूर, केळी असे उपवासाचे पदार्थ असतात. दररोज सकाळी ठीक ११.३० वा. मंदिरात अतिथी व मान्यवर देणगीदारांच्या हस्ते स्वामींना महानैवेद्य दाखवून, अन्नछत्रात महाआरती व संकल्प पार पडतात. यानंतर सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद दिला जातो. यासाठी अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांची प्रमाणपत्र आयएसओ मूल्यांकन प्रमाणपत्र व भारत सरकारचे भोग प्रमाणपत्र ही मिळालेले आहे. येथे सुमारे ३०० सेवेकरी असून त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ त्यांना मिळणाऱ्या मानधनातून चालतो.

परगावच्या स्वामी भक्तांच्या निवासाच्या दृष्टीने यात्री निवास, यात्री भुवन, अतिथी निवास, गणेश मंदिर यात्री थांबा व यात्रीनिवारा या निवासी इमारती बांधल्या असून यामध्ये स्वामी भक्तांना सोयी सुविधा देऊ केल्या आहेत. यात्री निवास ही भव्य इमारत २००३ पासून पासून स्वामी भक्तांच्या सेवेत रुजू झालेली आहे या इमारतीमध्ये मिनी हॉल सह कॉमन ६६ खोल्या असून १४ मोठे हॉल आहेत पैकी दहा हॉलमध्ये बेडची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या इमारतीमध्ये सुमारे २००० भक्त निवासाला थांबू शकतील इतकी क्षमता आहे. यात्री भुवन या इमारतीत नॉन एसी सुट आणि एसी सुट तसेच डीलक्स एसी सुटस आहेत. सदर इमारतीत सुमारे ५०० भक्त निवास करू शकतील इतकी क्षमता आहे गणेश मंदिर यात्री थांबा या इमारतीत एकूण बारा एसी सुट असून सुमारे ५० भक्त निवास करू शकतील इतकी क्षमता आहे. अतिथी निवास ही इमारत सुद्धा एसी असून येथे सुद्धा ५० भक्त विश्रांतीस राहू शकतील इतकी क्षमता आहे त्याचप्रमाणे स्वतंत्र पलंग व्यवस्था सुरू असून याची क्षमता ६१ इतकी आहे या सर्व इमारतीत लिफ्ट यंत्रणा कार्यान्वित असून अग्निशमन यंत्रणा सुद्धा बसविलेली आहे. सद्यस्थितीत अन्नछत्र मंडळाच्या परिसरात प्रशस्त आणि भव्य असे ८ एकरातील वाहनतळ, वाहनतळ शेड तसेच २९० के. वी. क्षमतेचा सोलर प्रकल्प कार्यान्वित आहे. अन्नछत्रामध्ये संस्थापक अध्यक्ष सन्मा. श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी स्वतः पुढाकार घेऊन सागवानी व उत्तम कलाकुसर केलेला असा स्वामींचा रथ केला असून हा रथ प्रतिवर्षी श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी वेळेस ७ दिवस पहाटे वेळेस शहरातून नगर प्रदक्षिणेस निघत असतो.भोसले घराण्याशी असलेले जुना ऋणानुबंध जपत भारतरत्न, गानसम्राज्ञी, आदरणीय लतादीदी मंगेशकर यांनी त्यांच्या वापरात असलेली दोन वाहने भेट म्हणून देऊ केलेली आहेत. न्यासाने मंडळाच्या परिसरामध्ये ती वाहने जतन करून ठेवलेली आपल्याला पाहायला मिळतात.

महाराष्ट्राची संस्कृती आणि इतिहास दर्शन घडवणारे शिव चरित्र, धातुशिल्प प्रदर्शन भक्तांना पाहण्यासाठी उभारण्यात आले आहे. भारतरत्न गानसम्राज्ञी आदरणीय लतादिदी मंगेशकर यांचेही मार्गदर्शन वेळोवेळी या न्यासास लाभलेले आहे. गडकिल्ले सृष्टी ही त्यांच्याच संकल्पनेतून साकारण्यात आली आहे. अतिथी निवासाजवळ स्वामींची महती भक्तांना कळण्यासाठी श्री स्वामी समर्थ जीवन चरित्र भिती



शिल्प साकारण्यात आले आहे.

अतिशय निसर्गरम्य वातावरणात सुशोभित आणि हिरवळीने नटलेल्या या आवारात श्री स्वामी समर्थ वाटिका व बालोद्यान सर्वांचेच लक्ष वेधून घेतात. न्यासाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्रतिवर्षी भव्य प्रमाणात आयोजित करण्यात येणारे गुरुपौर्णिमा आणि वर्धापन दिन हा महोत्सव. या १० दिवसिय धर्मसंकिर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्रमधील दिग्गज प्रवचन-कीर्तनकार, गायक कलाकार आपली सेवा स्वामींच्या चरणी रुजू करतात. त्याचप्रमाणे १९८८ पासून स्वामी दर्शनास, उत्सवास व कार्यक्रमाच्या निमित्त्य अन्नछत्रास वेळोवेळी सदिच्छा भेट देऊन व मार्गदर्शन करणाऱ्या दिग्गज मंडळी, मान्यवर व सन्मा. देणगीदार यांनी न्यासाचे कार्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या भक्तीचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने, प्रतिवर्षी श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा काढण्यात येते. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण, गोवा, कर्नाटक या राज्यातील स्वामी भक्तांना या माध्यमातून स्वामींच्या दर्शनाचा लाभ अन्नछत्र मंडळाच्या वतीने देण्यात येतो. सन १९९८ पासून ही पालखी परिक्रमा अखंडितपणे सुरू आहे.

अन्नदानाच्या या पवित्र कार्याबरोबरच, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासाच्यावतीने अनेक सामाजिक कार्यांना हातभार लावला गेला आहे आणि या माध्यमातून लोकाभिमुख अशा कामांना, कायमच प्राधान्य दिले जाते.

त्या समाजोपयोगी कार्याचा हा आढावा...

१९९३ च्या किल्लारीच्या महाविनाशकारी भुकंपाच्या वेळेस या न्यासाने सलग एक महिना दररोज ट्रक भरून अन्नवाटप केलेले आहे.

सामाजिक बांधिलकीचे भान ठेवत या न्यासाने अक्कलकोट शहर विकास कार्यासाठी मोठे योगदान दिले आहे. स्वमालकीच्या जमिनीपैकी ४ १/२ एकर जागा मुस्लीम कब्रस्तानास, ३ एकर जागा लिंगायत स्मशानभूमीसाठी आणि ११/२ एकर जागा बाह्यवळण रस्त्यास तसेच भक्तांच्या सोयीसाठी सुलभ शौचालयाकरीता मुस्लिम कब्रस्तानाजवळ स्वमालकीची जागा नगरपरिषदेस दिली आहे.८ कि.मी. अंतरावर असलेल्या गळोरगी येथील स्वमालकीच्या विहीरीतून ५ कोटी खर्चुन अन्नछत्रासाठी कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना केली आहे, तसेच वटवृक्ष देवस्थानासठीसुध्दा पाणी देऊ केले आहे.२०१४ मध्ये उद्भवलेल्या तीव्र पाणीटंचाई आणि दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये अन्नछत्र मंडळाच्या वतीने, गळोरगी येथील स्व-मालकीच्या विहिरीतून पाईप लाईन्दारे पाणी आणून सलग बारा महिने दररोज १२ लाख ५० हजार लिटर पाणी अक्कलकोट नगर परिषदेस देण्यात आले.हे न्यास भूकंपग्रस, जळीतग्रस्त, पूरग्रस्तांना तातडीने मदतीचा हात पुढे करते तसेच गरिब व गरजवंताना शैक्षणिक व वैद्यकीय मदत करते. ऑगस्ट २०१९ ला कोल्हापुर व सांगली तसेच डिसेंबर २०२१ ला चिपळूण येथील पुरग्रस्तांना तातडीने जीवनावश्यक वस्तू व अन्नधान्य शिधा वाटप करून, आपलं योगदान दिले आहे.

सर्व सण, उत्सव व इलेक्शन ड्युटीस कार्यरत असणारे सर्व शासकीय कर्मचारी व पोलीस बांधवांच्या भोजनाची व्यवस्था सुद्धा न्यासाकडून केली जाते. पोलिओ लसीकरणाचे वेळेस शहरातील कार्यरत असणाऱ्या कर्मचायांना भोजन व्यवस्था केली जाते. शासनाचे विविध उपक्रमास हे न्यास सर्वोतोपरी सहकार्य करते. राज्य परिवहन मंडळाच्या बाहेर गावाहून मुक्कामी येणाऱ्या सुमारे ५० ते ६० बसेसच्या चालक व वाहकांना सुद्धा अद्ययावत असे विश्रांती कक्ष व वाहनतळ न्यासाकडून या परिसरामध्ये उपलब्ध करून दिलेले आहे.

आतापर्यंत प्रति महिन्याची पौर्णिमा व मंडळास साजरा केल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या उत्सवा प्रसंगी २०१४ पासून सुमारे २५,००० पेक्षाही जास्त रक्तदात्यांकडून रक्त संकलन केले आणि खऱ्या अर्थाने रक्तदानाची चळवळ अक्कलकोट तालुक्यात रुजविली. तसेच स्वामी भक्तांसाठी अद्ययावत वैद्यकीय सुविधांनी युक्त ॲम्बुलन्स सेवा आणि फायर ब्रिगेड ची व्यवस्था उपलब्ध आहे. दिव्यांग व वृद्ध लोकांना अन्नछत्र परीसरात ने आण करण्यासाठी इलेक्ट्रिक बग्गी व व्हीलचेअरची सोय केली हे धर्मादाय न्यास शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमास नेहमी भरीव सहकार्य करीत असते. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक, पर्यावरण विषयक, क्रिडाविषयक व सांस्कृतिक उपक्रम सदैव राबवित असते. स्त्रिभृण हत्या, हुंडाबळी, महिला आरोग्य, वृक्ष लावा व जगवा, जल साक्षरता अभियान, स्वच्छता अभियान इ. कार्याच्या माध्यमातून हे न्यास सदैव अग्रेसर आहे.

वृक्षारोपण आणि त्याचे संवर्धन या महत् कार्यात सोलापूर-अक्कलकोट रस्त्याच्या दुतर्फा, वडाची झाडे लावून त्याचे जतन आणि संवर्धन करण्यात आले. शहरातील चौकाचे सुशोभीकरण केले आहे. फतेसिंह मैदानावर बसण्यासाठी सुमारे ५० नग सिमेंट बाकडे बसविले असून वृक्षारोपण व संवर्धन करून नगरपालिकेच्या विकास कार्यात मोठे योगदान देऊ केले आहे. अक्कलकोट शहराच्या विकासामध्ये श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने मोलाची भूमिका बजावलेली आहे. न्यासाच्या १९८८ पासून अविरत सेवेमुळे अक्कलकोट शहरातील



व लगतच्या भागातील लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगार उपलब्ध झालेला आहे.

अन्नछत्राच्या चौकात पोलीस चौकी, तहसील कार्यालय आणि ग्रामीण रुग्णालय, या ठिकाणी कायमस्वरूपी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.कोरोना काळात सामाजिक जाणिवेतून पुणे येथील कलावंताना मे २०२१ मध्ये मदत म्हणून सुमारे ३०० कोरोना काळात सामाजिक जाणिवेतून पुणे येथील कलावंताना मे २०२१ मध्ये मदत म्हणून सुमारे ३०० अन्नधान्य किटचे वाटप केले आहे. याच दरम्यान, अक्कलकोट येथील ग्रामीण भागात तसेच सोलापूर येथील गरजवंताना १२०० अन्नधान्य किट वाटप करण्यात आले. कोविडच्या आणि लॉकडाऊन च्या काळात, अक्कलकोट शहरामध्ये दररोज सुमारे १००० गरीब लोकांना तीन महिने जेवण वाटप केले. एकूण ५२ दिवसात ५१,५०० लोकांना अन्नवाटप केले आहे. शहरात व ग्रामीण भागात सॅनिटायझर ची फवारणी वेळोवेळी केली.

यात्रीनिवास या निवासी इमारतीमध्ये शासनाचे कोविड सेंटर सुरू केले. तेथील पॉझिटिव्ह रुग्णांना दररोज चहा, नाष्टा, दोन वेळचे जेवण देण्याचे कार्य केले आहे. कोव्हिड सेंटरला स्थानिक प्रशासनाच्या मागणीनुसार ५० बेड, ५० गाद्या, ५० उशा व बेडशिटस देत व्यवस्था करण्यात आली तसेच ससून हॉस्पिटल पुणे येथे व्हेंटीलेटर देऊ केले आहे.


यत्र नार्यस्तू पुज्यंते रमंते तत्र देवता, या उक्तीला सार्थ करत, स्त्री शक्ती प्रति आदर व्यक्त करण्यासाठी हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून हे न्यास उल्लेखनीय कार्य करीत आहे. हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था हे अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असून, ही संस्था सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, नवरात्री मध्ये तुळजाभवानी मंदिरात हजारो महिलांसमवेत कुंकुमअर्चन, गणेशोत्सवात हजारो महिलांसमवेत गणेश अथर्वशिर्ष पठण इ. उपक्रम राबवित सखी महिलांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. या संस्थेच्या अध्यक्षा- मा.सौ. अलकाताई जनमेजयराजे भोसले ह्या असून संस्थापक सचिवा मा.सौ. अर्पिताराजे अमोलराजे भोसले ह्या आहेत.

न्यासाचे संस्थापक अध्यक्ष सन्मा. श्री. जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली दत्तजयंती २०२१ पासून 'समर्थ महाप्रसाद सेवा' सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत, अक्कलकोट शहरातील दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या जवळपास २६० गरीब, गरजवंत व निराधार लोकांना दैनंदिन दोन वेळेचे जेवण, डब्यातून घरपोच करण्याचे कार्य, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळामार्फत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे हे न्यास गेली दोन वर्षापासून अक्कलकोट तालुक्यातील कुस्तीगीरांना दरमहा बदाम, काजू, आक्रोड, खारीक, साजूक तूप इ. पैलवानी खुराकाचे सुमारे ८६ कुस्तीगीरांना वाटप करीत आहे.

२०२१ मध्ये अन्नछत्रात अध्यक्षांचे कार्यालयालगत वटवृक्षाखाली असलेल्या जुन्या दत्त मंदिराची काळ्या पाषाणात उभारणी केली असून आतील सुंदर व देखणी दत्तमूर्ती जयपूरहून आणून स्थापित केली आहे. अन्नछत्राच्या पूर्वेस समर्थ वाटिकेजवळ, कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेच्या काळ्या पाषाणाच्या मंदिराचे बांधकाम केले असुन प्रति तुळजाभवानी मंदिर उभारण्यात आले आहे. २०२४ पासून भक्तांना दर्शनासाठी उपलब्ध झाले आहे.

पान १४ वर

श्री शामराव शिवराम मोरे
सचिव, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट











माझ्या नेत्याचा बाप काढायचा नाही

मोदींवरील टीकेने भाजप आक्रमक ;आ. सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी दिला सिद्धराम म्हेत्रे यांना सज्जड दम

अक्कलकोट/प्रतिनिधी:–

माझ्या नेत्याचा बाप काढायचा नाही!' असे म्हणत आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी हे आक्रमक झाले आहेत. त्यांनी माजी सिद्धराम म्हेत्रे यांना इशारा देताना त्यांची सर्व कुंडली बाहेर काढली. मोदींवरील टीकेने संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील भाजप आक्रमक झाली आहे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी सिद्धराम म्हेत्रे यांना सज्जड दम देत इशारा दिला आणि आम्हाला ही बाप काढता येतो असा समज ही दिला



काँग्रेस नेते सिद्धाराम म्हेत्रे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केलेल्या टीकेनंतर सोलापूर जिल्ह्यातील राजकारण तापले आहे. या टीकेला भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अत्यंत आक्रमक भाषेत प्रत्युत्तर दिले आहे.

माझ्या नेत्याचा बाप काढायचा नाही, नाहीतर याद राखा, अशा शब्दांत कल्याणशेट्टी यांनी म्हेत्रेंना सज्जड दम दिला.

एका कार्यक्रमात बोलताना कल्याणशेट्टी म्हणाले की, टीका करायची असेल तर कामावर करा, विकासावर बोला. पण आमच्या नेत्यावर, त्यांच्या कुटुंबावर वैयक्तिक टीका खपवून घेतली जाणार नाही. मोदींवर टीका करणाऱ्यांना भाजप कार्यकर्ता जशास तसे उत्तर देईल.

म्हेत्रे यांनी मोदींवर केलेल्या वक्तव्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. कल्याणशेट्टींच्या या आक्रमक भूमिकेमुळे सोलापूरमधील भाजप - काँग्रेस वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे.


श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील गाभाऱ्यात दिपावली लक्ष्मीपूजन संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधी:–

दिपावलीच्या पावन पर्वावर येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील स्वामींच्या गाभाऱ्यात नरक चतुर्दशी व लक्ष्मीपूजन मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाली. यावेळी मंदिर फुलांनी, दिव्यांनी आणि रोषणाईने उजळून निघाले होते.

मंदीर समितीचे चेअरमन महेश मालक इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरोहित मोहनराव पुजारी यांच्या अधिपत्त्याखाली पुरोहित मंदार महाराज यांच्या हस्ते पहाटे ५ वाजता काकड आरती व सकाळी ११:३० वाजता श्री स्वामी समर्थांची नैवेद्य आरती व सायकाळी ७ वाजता लक्ष्मीपुजन संपन्न झाली.

यावेळी स्वामींच्या मूर्तीला व लक्ष्मीच्या मुर्तीला आकर्षक वस्त्रालंकार, फुलांच्या माळा, हार घालून मनमोहक सजावट करण्यात आली होती. गाभाऱ्यात फळे, नैवेद्य, दिवे यांनी नरक चतुर्दशी व लक्ष्मीपूजनाचा माहोल अधिकच मंगलमय झाला होता. या प्रसंगी देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश मालक इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी श्री स्वामी समर्थांचे व माता लक्ष्मीचे दर्शन घेऊन सर्व भाविकांच्या सुख, समृद्धी व भरभराटीसाठी प्रार्थना केली. लक्ष्मी पूजनासाठी अक्कलकोटसह परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. अनेक भाविकांनी स्वामींच्या गाभाऱ्यातील हे दिव्य रूप पाहून धन्य झाल्याची भावना व्यक्त केली. सायंकाळी ७.४५ वाजता नेहमीप्रमाणे महाराजांची शेजारती संपन्न होऊन भाविकांना प्रसाद वाटण्यात आला. यावेळी प्रथमेश मालक इंगळे, मंदार महाराज पुजारी, व्यंकटेश महाराज पुजारी, मोहित महाराज पुजारी, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, विपुल जाधव, सागर गोंडाळ, श्रीपाद सरदेशमुख, सिद्धाराम कुंभार, गिरीश पवार आदींसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दीपावली नरक चतुर्दशी व लक्ष्मी पूजना निमित्त श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिराच्या गाभाऱ्यातील श्री स्वामी समर्थांची प्रसन्न भावमुद्राव लक्ष्मीपूजनाचे प्रसंग छायाचित्रात दिसत आहे.

एम के फौंडेशन ने केले बहुरूपी नगर मधील गोर गरीब गरजू कुटुंबांना दिवाळी किट चे वाटप

सोलापूर/प्रतिनिधी:–

सोलापुरात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर एम. के. फाउंडेशनचा माणुसकीचा दीपोत्सव; बहुरूपी नगरमध्ये गरजू कुटुंबांना दिवाळी शिधा किटचे वाटप करण्यात आले. त्याच बरोबर शहर व ग्रामीण विविध भागातही दिवाळी किट वाटप करण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यात आणि परिसरात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक शेतकरी, कष्टकरी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसमोर सण साजरा करण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत दिवाळीचा आनंद प्रत्येकाच्या घरापर्यंत पोहोचावा आणि गरजू कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी, या सामाजिक बांधिलकीतून एम. के. फाउंडेशनच्या वतीने बहुरूपी नगर, विजापूर रोड येथे गरजू कुटुंबांना दिवाळी शिधा किटचे वाटप करण्यात आले.

एम. के. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांच्या पुढाकारातून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यावेळी बहुरूपी नगरमधील मल्लेश सूर्यवंशी, बसवराज सितारे, सुभाष सितारे, कल्लाप्पा तेले यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते. तसेच एम. के. फाउंडेशन परिवाराचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या गरजू कुटुंबांना सणासुदीच्या काळात थोडा आधार मिळावा, त्यांच्या घरातही दिवाळीचा आनंद निर्माण व्हावा, या उद्देशाने फाउंडेशनच्या वतीने शिधा किट तयार करण्यात आले होते. गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहोचवताना त्यांच्या स्वाभिमानाचा आणि सन्मानाचा विचार करण्यात आला.

यावेळी बोलताना महादेव कोगनुरे यांनी सामाजिक बांधिलकी जपत समाजातील गरजू घटकांच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी माणुसकी असल्याची भावना व्यक्त केली. केवळ सणाच्या शुभेच्छा देण्यापेक्षा गरजूंच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न महत्त्वाचा आहे, असेही त्यांनी सांगितले.

दिवाळीचा खरा आनंद केवळ आपल्या घरात दिवे लावण्यात नसून, दुसऱ्याच्या घरातही आनंदाचा दिवा पेटवण्यात आहे, या भावनेतून एम. के. फाउंडेशनच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे बहुरूपी नगरमधील गरजू कुटुंबांच्या दिवाळीत आनंदाचा गोडवा निर्माण झाला...

नाथाजी कुंभार यांचे निधन

चाफळ/प्रतिनिधी : –



वेळू, ता. कोरेगाव येथील उत्तम पखवाज वादक कै. नाथाजी तुकाराम कुंभार यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. परिसरात ते नाना या नावाने सुपरिचित होते. आपल्या सुश्राव्य पखवाज वादनाने त्यांनी भजन आणि कीर्तन क्षेत्रात मोलाचे योगदान दिले होते. त्यांच्या निधनाने वेळू व कोरेगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विरेवाडी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कुंभार यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन आणि दशक्रिया विधी मंगळवार, दि. १० रोजी सकाळी ९ वाजता वेळू येथे होणार आहे.

रंजना कांबळे यांचे निधन

ईश्वरपूर/प्रतिनिधी : –



साखराळे (ता. वाळवा) येथील सौ. रंजना सोपानराव कांबळे (वय ७२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, विवाहित मुलगा,तीन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. जलदान विधी मंगळवार, दि. १० रोजी सकाळी ९.३० वाजता साखराळे येथे होणार आहे. उरुण ईश्वरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक सोपानराव कांबळे यांच्या त्या पत्नी, तर बाजार समितीचे कर्मचारी सचिन कांबळे यांच्या त्या मतोश्री होत.

विश्वासराव काळे यांचे निधन

वडूज/प्रतिनिधी : –



येथील जुन्या पिढीतील ज्येष्ठ नेते विश्वासराव विठ्ठलराव काळे (वय ८५) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, सून, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विश्वास भाऊ या नावाने ते परिचीत होते. खटाव तालुका स्वातंत्र्य सैनिक, उत्तराधिकारी संघटनेचे माजी अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले होते. वडूज शिक्षण विकास मंडळाचे माजी सचिव, विद्यमान संचालक व स्कूल कमिटीचे ते माजी अध्यक्ष होते. ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली होती.

धनगर समाजाचे ज्येष्ठ नेते व मार्गदर्शक म्हणूनही ते परिचीत होते. विविध

सामाजिक, राजकीय कार्यात त्यांचा सहभाग होता. माजी आमदार (कै.) भाऊसाहेब गुदगे यांचे ते जुन्या पिढीतील निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून परिचीत होते. पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा काळे यांचे ते पती, प्रगतशिल शेतकरी, पशुखाद्य वितरक, दुध

व्यवसायिक रविराज काळे यांचे ते वडील, पत्रकार विक्रमसिंह काळे यांचे चुलते होत. विविध मान्यवरांनी त्यांचे अंत्यदर्शन घेऊन श्रध्दांजली वाहिली.









साताऱ्यात बाळूमामांच्या पालखीचे आगमन

जानकर कॉलनीत तीन दिवस मुक्काम, मेंढरांचा कळप पाहण्यासाठी भाविकांची गर्दी!

सातारा/प्रतिनिधी:–

बाळूमामांच्या पालखीचे साताऱ्यात आगमन झाले असून जानकर कॉलनी येथे पालखीचा तीन दिवस मुक्काम आहे. बाळूमामांच्या मेंढरांचा भव्य कळप पाहण्यासाठी साताऱ्यासह परिसरातील नागरिक आणि भाविक मोठ्या संख्येने येत आहेत. तब्बल तीन वर्षांनंतर पालखीचे आगमन झाल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

नगरसेवक अशोक शेडगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, दररोज सकाळी ९ वाजता आरती व प्रसाद, तर रात्री ९ वाजता महारती व प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच उद्या सकाळी ९ वाजता मेंढरांच्या लेंडी पूजनाचा भव्य सोहळा पार पडणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सातारकरांनी या धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रकाश भगवान कोकरे यांनी सांगितले की, सर्वसामान्य नागरिकांना प्रत्यक्ष बाळूमामांचे दर्शन घेता यावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. आर्थिक किंवा अन्य अडचणींमुळे अनेक भाविकांना आदमापूर येथे जाणे शक्य होत नाही. अशा भाविकांना साताऱ्यातच दर्शनाची संधी उपलब्ध झाली आहे.

या आयोजनासाठी नियोजन समितीचे अशोक शेडगे, समाजसेवक समीर माने, सचिन जगताप तसेच नगरसेवक वसंत लिवे यांचे सहकार्य लाभल्याचे कोकरे यांनी सांगितले.



बाळूमामांच्या मेंढरांच्या कळपात सुमारे सहा हजार मेंढरे असून त्यांच्या आगमनामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. बाळूमामांच्या श्रद्धा आणि महात्म्याविषयी भाविकांमध्ये मोठी आस्था असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

या धार्मिक सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बाळूमामांचे दर्शन व आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

अशोकराज चॅरिटेबल ट्रस्टतर्फे गरजूंना दिवाळी फराळाचे वाटप

दुष्काळग्रस्त गरीब कुटुंबांच्या चेहऱ्यावर फुलवला आनंद; सामाजिक बांधिलकीचा स्तुत्य उपक्रम

कराड/प्रतिनिधी : –

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक गरीब व गरजू कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे त्यांना दिवाळीसारखा आनंदाचा सण उत्साहात साजरा करणे शक्य होत नाही. अशा कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, त्यांच्या घरातही दिवाळीचा गोडवा निर्माण व्हावा आणि त्यांना मायेचा आधार मिळावा, या उदात्त सामाजिक भावनेतून ना. शंभूराज देसाई, यशराज देसाई व उदयसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून अशोकराज चॅरिटेबल ट्रस्ट, साकुर्डी पेठ यांच्यावतीने गरजू व गरीब कुटुंबांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.


या उपक्रमाचा मुख्य उद्देश समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू व वंचित घटकांनाही दिवाळीचा सण आनंदाने साजरा करता यावा, हा होता. दिवाळी हा केवळ रोषणाईचा आणि आनंदाचा सण नसून एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा, माणुसकी जपण्याचा आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा सण आहे. याच भावनेतून ट्रस्टच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थित कराड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शीतलकुमार कोल्हाळे व मिलिंद पाटील यांच्या हस्ते फराळाचे वाटप करण्यात आले.

यावेळी अशोकराज उद्योग समूहाचे अध्यक्ष शरद जयसिंगराव चव्हाण, राजकुमार चव्हाण, विश्वासराव निकम, जगदीश पाटील, हनुमंतराव चव्हाण, शिवाजीराव गायकवाड, हिम्मतराव थोरात, अर्जुन कळंबे, अविनाश देसाई, यशवंत यादव, सुनील पाटील, निवासराव शिंदे, तुकाराम डुबल, धनाजी पाटील, विश्वास कणसे व सतीश पानुगडे यांची उपस्थिती होती.





यावेळी उपस्थित मान्यवरांनी ट्रस्टच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देणे, त्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करणे आणि सामाजिक एकोपा वाढविणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. ट्रस्टच्या माध्यमातून यापुढेही शैक्षणिक, सामाजिक आणि गरजू घटकांच्या मदतीसाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे ट्रस्टचे अध्यक्ष चव्हाण यांनी सांगितले. या उपक्रमाचे आयोजन अशोकराज चॅरिटेबल ट्रस्ट व अशोकराज उद्योग समूह, साकुर्डी पेठ यांच्या वतीने करण्यात आले.







































श्री सेवागिरी महाराजांचा प्रकटदिन सोहळा उत्साहात

महाभिषेक, लघुरुद्र, होमहवन, कीर्तन व महाप्रसादाने परिसर भक्तिमय

पुसेगाव/प्रतिनिधी : –

येथील प. पू. श्री सेवागिरी महाराज यांचा प्रकटदिन सोहळा शनिवारी (ता. ७) मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. यानिमित्त आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांना हजारो भाविकांनी उपस्थिती लावत श्रींच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. दिवसभर मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

धनत्रयोदशीच्या शुभमुहूर्तावर साजऱ्या झालेल्या या सोहळ्यानिमित्त श्री सेवागिरी महाराज देवस्थान ट्रस्टच्या वतीने दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवारी (ता. ६) सायंकाळी श्रीकांत महाराज पातकर (श्री संत ज्ञानेश्वर माऊली संस्थान समिती, आळंदी देवाची) यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. कीर्तनाला भाविकांनी मोठी गर्दी केली होती. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.



पुसेगाव : श्री सेवागिरी महाराजांचा प्रकटदिन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

शनिवारी पहाटे मठाधिपती श्रीमहंत सुंदरगिरी महाराज, ट्रस्टचे अध्यक्ष संतोष ऊर्फ बाळासाहेब जाधव, विश्वस्त डॉ. सुरेश जाधव, रणधीर जाधव, संतोष वाघ, सचिन देशमुख, गौरव जाधव व मान्यवरांच्या उपस्थितीत श्रींच्या समाधीवर विधिवत महाभिषेक करण्यात आला. सकाळी लघुरुद्र व होमहवन विधी पार पडले. त्यानंतर श्रींच्या समाधीवर रुद्राभिषेक व पुष्पवृष्टी करण्यात आली. दुपारी नित्य मध्यान्ह आरती झाल्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व धार्मिक विधींमध्ये भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला.

प्रकटदिनानिमित्त मंदिर व परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांची गर्दी सुरू होती. पुसेगावसह खटाव तालुका आणि परिसरातील गावांमधून हजारो भाविकांनी श्रींच्या दर्शनासाठी हजेरी लावली. शिस्तबद्ध नियोजनामुळे धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठीही भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

श्री सेवागिरी महाराजांच्या प्रकटदिनानिमित्त पुसेगावमध्ये सकाळपासूनच उत्साहाचे वातावरण होते. मंदिर परिसरात भाविकांची रेलचेल, दर्शनासाठी लागलेल्या रांगा आणि महाप्रसादासाठी झालेली गर्दी यामुळे संपूर्ण पुसेगाव नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली होती. हजारो भाविकांच्या उपस्थितीने प्रकटदिन सोहळ्याला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

गोरगरीब कुटुंबे,दिव्यांग व अनाथ मुला-मुलींची दिवाळी गोड

उरुण ईश्वरपूर येथे जयंत दारिद्र्य निर्मूलन अभियानच्या वतीने वितरण

ईश्वरपूर/प्रतिनिधी : –

माजी मंत्री आ. जयंतराव पाटील, राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या उन्नतीसाठी कार्यरत जयंत दारिद्र्य निर्मूलन अभियानच्या वतीने वाळवा तालुक्या तील गोर गरीब कुटुंबे, दिव्यांग व अनाथ मुला-मुलींची दिवाळी गोड करण्यात आली.

३२ मुला-मुलींना दिवाळीसाठी कपडे, मिठाई आणि शालेय साहित्य, १० गोरगरीब कुटुंबाना आर्थिक मदतीचा धनादेश, दिव्यांग रामचंद्र पाटील (तुजारपूर) यांना व्हीलचेअर, पार्वती शंकर यादव (बहे) यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतील रुपये ५० हजारच्या मंजुरीचे पत्र वाटप करण्यात आले. राजारामबापू ज्ञान प्रबोधिनी येथे प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा.शामराव पाटील,राजारामबापू सहकारी बँकेचे अध्यक्ष विजयराव यादव यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले.



प्रा. शामराव पाटील म्हणाले, या मुला-मुलींच्या, तसेच दिव्यांग, गोरगरीब व्यक्तींच्या चेहऱ्यावरील आंनद, हीच जयंत दारिद्र्य निर्मूलन अभियानच्या कामाची पोच आहे. भविष्यात अभियानच्या कामाला अधिक गती देवू.

याप्रसंगी नेर्ले गांवचे सरपंच संजय पाटील, युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष देवराज देशमुख, उरूण ईश्वरपूरच्या नगरसेविका पुष्पलता खरात, सचिनकाका पाटील (कासेगाव), जयंत दारिद्र्य निर्मूलन अभियानचे समन्वयक इलियास पिरजादे, सौ. उज्वला पाटील, विकास कुलकर्णी, सुरेंद्र बांदल प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रारंभी, अभियानचे समन्वयक इलियास पिरजादे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अभियानचे संघटक विनायक मुळीक, राजाराम जाधव, शशिकांत दगडे, सागर पवार, श्रीरंग नाईक, सचिन मुळीक, दीपक चव्हाण, इम्तियाज पिरजादे, जालिंदर पाटील, किरण खोत, शशिकांत वायदंडे संदीप साठे, प्रसाद शेळके, ओंकार चव्हाण, धुळेश्वर पाटील, हरी मोरे, आदिनाथ तडाके यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. संघटक अनिल जाधव यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी व लाभार्थी उपस्थित होते.





कराड नगरपरिषद, कराड

जाहीर सूचना

आरोग्य विभाग

स्वच्छ दिवाळी–शुभ दिनाळी व माझी वसुंधरा अभियान ७.० ध्वनी प्रदूषण व फटाके नियंत्रणाबाबत नागरिकांना आवाहन

कराड शहरातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की मा. मुंबईत उज्ज न्यायालयाने स्वतः हुन दाखल केलेल्या जनहित याचिका क. ०१/२०२६ मध्ये दि. २२/०१/२०२६/१५/१०/२०१६ रोजी दिलेल्या आदेश तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडल यांची अधिसूचना MPCB/JD (APC)TB/B-0073 दिनांक ०३/१०/२०२४ नुसार जास्त आवाज निर्माण करणा-या वायूप्रदूषण करणा-या फटाक्यांची निर्मिती विक्री किंवा वापर करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे तसेच आपणास सर्वांना माहीतच आहे की, आपण वातावरणीय बदला सामोरे जात आहोत वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेने प्रदूषण हे एक महत्वाचे कारण आहे. विविध सण/उत्सव प्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यांमध्ये कार्बन व सल्फरचे प्रमाण अधिक असते. जे विषारी वायूंची श्रेणी तयार करतात. त्याअनुषंगाने कराड नगरपरिषद कराड शहरातील नागरिकांना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करण्याचे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

१. सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास प्रतिबंध

सार्वजनिक रस्ते, रस्त्याच्या कडेला असलेली ठिकाणे, गल्ली, फुटपाच व इतर सार्वजनिक ठिकाणी सण/उत्सवाच्या काळात फटाके फोडू नयेत.

२. शांतता क्षेत्रांमध्ये फटाके फोडण्यास विशेष प्रतिबंध

मा. न्यायालये, रुग्णालये, शासकीय कार्यालये, शाळा व इतर शांतता क्षेत्रांच्या परिसरात फटाके फोड नयेत.

३. ध्वनिवर्धक यंत्रणेबाबत आवश्यक परवानगी व अटींचे पालन करणे,

सार्वजनिक कार्यक्रम, मिरवणुका किंवा इतर कार्यक्रमांमध्ये ध्वनिवर्धक यंत्रणेचा वापर करण्याकरिता सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेणे व परवानगीच्या सर्व अटींचे पालन करणे आवश्यक राहील.

४. ध्वनी व वायु प्रदूषण टाळा

फटाके व ध्वनिवर्धक यंत्रणेमुळे ध्वनी प्रदूषण तसेच फटाक्यांमुळे वायू प्रदूषण होऊन तागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे नागरिकानी पयांवरणपूरक पद्धतीने मण/उत्सव साजरे करावेत.

५. फटाक्यांच्या वापराबाबत आवाहन

तुलनेने कमी ध्वनी व कमी उत्सर्जन करणाऱ्या त्रीशशाप उीरलज्ञशीा (हरित फटाके) चा वापर करण्यास प्राधान्य द्यावे, त्रीशशाप उीरलज्ञशीा (हरित फटाके) म्हणजे तुलनेने कमी प्रदूषणकारी फटाके असून त्यांच्या निर्मितीमध्ये पारंपरिक फटाक्यांच्या तुलनेत प्रदूपक घटकांचे प्रमाण कमी ठेवले जाते.

Green Crackers (हरित फटाके पूर्णपणे प्रदूषणमुक्त नमनान, त्यामुळे त्याचा वापर करतानाही लागू असलेल्या नियमांचे व वेळेच्या मर्यादांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून शांत, सुरक्षित व प्रदूषणमुक्त सण / उत्सव साजरे करण्याच्या अनुषंगाने सर्व नागरिकांनी कराड नगरपरिषदेस सहकार्य करावे.

सर्व सभापती, उपसभापती, सर्व नगरसेवक, नगरसेविका व कर्मचारी वृंद

सही/–	सही/–	सही/–	सही/–
मुख्याधिकारी	आरोग्य सभापती	उपनगराध्यक्ष	नगराध्यक्ष
कराड नगरपरिषद, कराड	कराड नगरपरिषद, कराड	कराड नगरपरिषद, कराड	कराड नगरपरिषद, कराड

येडशीत अग्नितांडवाने सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू

करंडे कुटुंबावर कोसळलेला दुःखाचा डोंगर : परिसरात शोककळा

पंढरपूर/प्रतिनिधी:–

धाराशिव जिल्ह्यातील येडशी गावात आज मध्यरात्री करंडे कुटुंबीयांच्या घराला लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातील सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना अत्यंत हृदयद्रावक आणि मन सुन्न करणारी आहे. दिवाळीसारख्या आनंदाच्या, मांगल्याच्या आणि प्रकाशाच्या सणात एका कुटुंबावर काळाने असा घाला घालावा, ही बाब अतिशय वेदनादायी आहे. ज्या घरात सणाचा आनंद आणि उत्साह असायला हवा होता, त्या घरात आज दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेने संपूर्ण धाराशिव जिल्हा शोकसागरात बुडाला असून, या दुःखद प्रसंगात कारंडे कुटुंबीयांच्या दुःखात मी मनापासून सहभागी आहे, अशा शब्दांत पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी आपल्या तीव्र शोकभावना व्यक्त केल्या.


या दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्या सर्व सहा जणांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कुटुंबीयांप्रती सरनाईक यांनी मन:पूर्वक संवेदना व्यक्त केल्या. कोणत्याही कुटुंबासाठी आपल्या प्रियजनांना अशा प्रकारे गमावणे ही कधीही भरून न निघणारी हानी आहे. या कुटुंबावर ओढवलेल्या दुःखाची तीव्रता शब्दांत व्यक्त करणेही कठीण आहे. या कठीण प्रसंगी शासन आणि जिल्हा प्रशासन पीडित कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या घटनेची सखोल चौकशी करून आगीचे नेमके कारण शोधण्यात यावे. तसेच मृत व्यक्तींच्या वारसांना शासनाच्या माध्यमातून आर्थिक व इतर आवश्यक मदत मिळावी, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने आवश्यक प्रस्ताव शासनाकडे सादर करावा, असे निर्देश पालकमंत्री सरनाईक यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

या दुर्घटनेतून जे कुटुंबीय बचावले आहेत, त्यांच्यावरही मोठा मानसिक आघात झाला असण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ आर्थिक मदत देऊन प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. त्यांना योग्य समुपदेशन, मानसिक आधार आणि








आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे तितकेच महत्त्वाचे आहे. या दुःखद प्रसंगातून सावरण्यासाठी प्रशासनाने त्यांना सर्वतोपरी सहकार्य करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

एका निष्पाप कुटुंबाचा संसार आगीच्या भक्ष्यस्थानी पडून सहा जीवांचा अंत होणे ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून संपूर्ण समाजाला हादरवून सोडणारी घटना आहे. अशा दुर्घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी घरगुती वीजजोडण्या, अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन बचाव व्यवस्थेबाबत आवश्यक ती दक्षता घेण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

या दुःखाच्या काळात करंडे कुटुंबीयांना धीर मिळावा, त्यांना या आघातातून सावरण्याचे बळ मिळावे, हीच ईश्वरचरणी प्रार्थना असल्याचेही पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या..

पान १० वरून

ऑक्टोंबर २०२३ पासून सोलापूरच्या बी.सी. गर्ल्स हॉस्टेल मधील अनाथ १५० मुलींच्या भोजनासाठी दरमहा अन्नधान्य व खाद्यतेल पुरवठा केला जातो. जानेवारी २०२४ पासून तालुक्यातील ८६ कुस्तीगीरांना दरमहा तूप, खारीक, बदाम, अक्रोड इत्यादींचे खुराक वाटप सुरू केले आहे.

एक दृष्टिक्षेप- नव्याने बांधण्यात येणाऱ्या नियोजित महप्रसादगृहाच्या वास्तूवर....

नियोजित ५ मजली महाप्रसादगृहाची इमारत ही भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित् असून या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल. या नवीन नियोजित महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, या आराखड्याच्या माध्यमातून हे पाहू शकता की, एकूण ५ हजार भाविकांसाठी सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य- भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्यात येणार आहे.

सदर इमारतीचे बांधकाम नोव्हेंबर २०२४ पासून सुरु झाले असुन ही सर्व अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज व प्रशस्त इमारत, स्वामी भक्तांच्या देणगीतून साकार होणार आहे. या बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ७२ कोटी, इतका अपेक्षित आहे. सदर इमारतीस नगरपालिकेची रीतसर बांधकाम परवानगी घेतली आहे आणि या नियोजित भव्य ५ मजली महाप्रसादगृह इमारतीचे बांधकाम सुरू आहे. सदर नियोजित भव्य अशा ५ मजली महाप्रसादगृह इमारतीचे भूमिपूजन दि.२१ जुलै २०२४, रोजी तत्कालीन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व सद्याचे मुख्यमंत्री ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे हस्ते संपन्न झाले आहे. तसेच दि.१९ जुलै २०२६ रोजी आदरणीय ख्यातनाम गायिका उषाताई मंगेशकर यांचे शुभहस्ते या महाप्रसादगृहालगत प्रशासकीय इमारत बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले आहे.

श्री स्वामी समर्थांची कृपादृष्टी, स्वामी भक्तांचा स्वामींच्या रुपात मिळणारा आशीर्वाद आणि अन्नछत्रात अहोरात्र व अविरत परिश्रम करणारे, निस्वार्थी वृत्तीने सेवा करणारे असंख्य सेवेकरी व कार्यकर्ते त्यांचे परिश्रम व विनम्रता यावरच अन्नछत्राची शून्यातून निर्मिती होऊन इवल्याशा रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. अन्नदानाच्या धर्मकार्यास वाहून घेतलेले स्वामी रूपातील असंख्य देणगीदार आणि तरुण उत्साही व नम्र कार्यकर्ते आणि निस्वार्थीपणे सेवा करणारे सेवेकरी हेच या न्यासाच्या यशाचे गमक आहे.

विटा नगरपरिषद विटा

जिल्हा – सांगली

दुरध्वनी –०२३४७ २७२०२१ टोल फ्री : १८००२३३२३८२

ई-मेल - covitamc@gmail.com

स्वच्छ सर्वेक्षण २०२६-२७

जाहीर आवाहन

प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करणे

विटा शहर हद्दीतील सर्व फटाके विक्री करणारे व्यावसायिक व फटाके वापर करणारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार अधिसूचना क्रमांक G.S.R. 682(E), dt. ०५.१०.१९९९ अन्वये 125db (AI) पेक्षा जास्त अवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास तसेच महाराष्ट्र शासन निर्णय परिपत्रक क्र. मंकीर्ण १०००/मी-१८६/पोल-९ दि. ०६/११/२०२० अन्वये आयात केलेले फटाके विक्री किंवा त्याचा वापर करण्यास मनाई आहे.

अशा फटाक्यांचे निर्मिती, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरीअम सॉल्ट, लिथियम, अर्सेनिक, लीड, मर्क्युरी यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकांमुळे विपारी बायू तयार होतात. हे वायू प्राणी व वनस्पती या दोघांनाही घटक आहेत. तसेच जनहित याचिका क्र. १५२/२०१७ मध्ये मा. ना. उच्च न्यायालयाने दिएल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम १८८४ आणि त्या अंतर्गत केलेल्या विस्फोटक अधिनियम, २००८ मधील प्रतिबंध व नियम यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करण्याचे नाही. तसेच प्रदूषणकारी फटाक्यांचा वापर टाळावा किवा जास्तीत जास्त हरित फटाक्यांचा वापर करावा कारण इतर फटाक्यांपेक्षा कमी हानिकारक रमायने असलेले फटाके असून ४० टक्क्यांनी धूर कमी उत्सर्जित करणारे व कमी राख करणारे कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च (CSIR) पेट्रोलियम बैंड एक्सप्लोजिव्ह मेफ्टी ऑर्गनायझेशन प्रमाणे ॲल्युमिनियम चे प्रमाण कमी असणारे फटाक्यांचा वापर करावा.

महाराष्ट्र शासनाचे माजी वसुंधरा अभियान ६.० व स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अभियान विटा नगर परिषद नर्फे प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत फटाके मुक्त, प्लास्टिक मुक्त, कचरा मुक्त व पर्यावरण पूरक ग्रीन फेस्टिबल, तसेच प्रदूषण विरहित सण उत्सव साजरे करण्याचा प्रयत्न करूया. नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करावा. सणसमारंभामध्ये टाकाऊ वस्तूंचा व पुनर्वापर करणे योग्य वस्तूंचा वापर जास्तीत जास्त करुन पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करुया.

तरी येणारी दिवाळी हरित व पर्यावरण पूरक दिवाळी म्हणून साजरी करूया, सर्व नागरिकांनी मिळून महकार्य करून पुन्हा एकदा स्वच्छतेच्या शर्यतीत विटा शहराला प्रथम क्रमांक मिळवून देण्यासाठी आपले बहुमूल्य योगदान द्यावे. तसेच ही दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो अशी सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

सर्वांना पर्यावरण पूरक दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

सही/–
सौ. काजलताई म्हेत्रे
मा. नगरध्यक्षा,
विटा नगरपरिषद, विटा

सही/–
श्री. अमोल बावर
मा. उप नगराध्यक्ष
विटा नगरपरिषद, विटा

सही/–
श्री. भालचंद्र कांबळे
मा. सभापती, आरोग्य समिती
विटा नगरपरिषद, विटा

सही/–
श्री. विक्रमसिंह पाटील
मुख्याधिकारी,
विटा नगरपरिषद, विटा

पांचगणी गिरिस्थान नगरपरिषद पांचगणी

माझी वसुंधरा अभियान ७.०

अंतर्गत

फटाके वापराबाबत जाहीर सूचना

फटाकेमुक्त पर्यावरण पूरक दिवाळी

फटाके नको, प्रकृतीची साथ हवी!

१२५ db पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करणे बेकायदेशीर आहे.

फटाके प्रदूषण वाढवतात आणि पर्यावरणाचे नुकसान करतात.

वायू प्रदूषणामुळे वनस्पती, पक्षी, प्राणी तसेच मानवाच्या आरोग्यास हानी पोहोचते.

फटाके टाळा, आरोग्य जपा.

आजची जबाबदारी उद्याच्या निरोगी पृथ्वीवरिता.

पांचगणी शहरातील सर्व नागरिकांना जाहीर सूचना देण्यात येते की,

भारत सरकार विशेष अधिसूचना क्रमांक G.S.R.682(E) date. 5/10/1999 अन्वये १२५ db (A१)पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती विक्री किंवा वापर करण्यास सक्त मनाई केलेली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे तसेच आपणा सर्वांना माहितच आहे की आपण पर्यावरणीय बदलाला सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण एक महत्त्वाचे कारण आहे. विविध सण उत्सवप्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यांमध्ये कार्बन व सल्फरचे प्रमाण अधिक असते जे विषारी वायूची श्रेणी तयार करतात हे वायू वनस्पती पक्षी, प्राणी तसेच मानवी प्रजातीस हांनी पोहोचवतात. हवेचे प्रदूषण थांबविण्याची आपण स्वत:पासून सुरूवात करू शकतो.

दिवाळी हा सण आपण सर्व भारतीय अत्यंत आनंदाचा सण मानतो. हा सणला धराधरात प्रसन्न वातावरण असते. परंतु या काळात फटाक्यांच्या वापरामुळे ध्यांनी प्रदूषण, वायु प्रदूषण होऊन मानव व जीवसृष्टीतल्या पशु-पक्षी-प्राणी हा सर्वावर फटाक्यांच्या प्रदूषणामुळे विपरित परिणाम होतो. फटाक्यांमधून निघणारा सल्फर डायऑक्साईड विषारी वायुमुळे सर्वच जीवसृष्टीवर त्याचा वाईट परिणाम होतो. फटाक्यांचा वापर टाळून खच्या अर्थाने प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करता येईल.

सबब माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, फटाके न फोडता येणारे सण पर्यावरणपूरक साजरे करूया व आनंदी व सुरक्षित राहूया, तसेच येणारी दिवाळी आनंदी सुखासमाधानाची जावो,

दीपावली निमित्त सर्वाना मंगलमय शुभेच्छा!

नगराध्यक्ष
पांचगणी गिरिस्थान नगरपरिषद, पांचगणी

मुख्याधिकारी
पांचगणी गिरिस्थान नगरपरिषद, पांचगणी

स्वच्छ हवा हिरवी पृथ्वी सुंदर भविष्य



आ.डॉ.अतुलबाबा भोसले
कराड दक्षिण विधानसभा



श्री.छ.खा.उदयनराजे भोसले



डॉ.सुरेश भोसले





मा.मानसिंग पाटील
उपसरपंच,ग्रामपंचायत विजयनगर



मा.प्रतापसिंह पाटील,
उद्योजक

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा



मा.आ.आनंदराव पाटील (नाना)

केदारनाथ पेट्रोलियम,कराड
एम.पी.ऑटोमोबाईल,वळसे,सातारा
हॉटेल पार्वती,वळसे,सातारा
हॉटेल अजिंक्यतारा,वळसे,सातारा
पार्वती मल्टिपर्पज हॉल,विजयनगर

आर्थिक विकासाचा वेग आणि विषमतेचा पेच



विकासाच्या झगमगाटात सामान्य माणसाच्या जगण्याचा संघर्ष कायम भारताने गेल्या काही दशकांत आर्थिक विकासाच्या दिशेने मोठी झेप घेतली आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत देशाचे स्थान उंचावले, पायाभूत सुविधांचा विस्तार झाला, डिजिटल तंत्रज्ञानाने सामान्य माणसाच्या जीवनात प्रवेश केला आणि कोट्यवधी नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा झाली. गरिबी कमी करण्याच्या प्रयत्नांनाही सकारात्मक यश मिळाले. मात्र, या विकासाच्या प्रवासात एक महत्त्वाचा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. गरिबी कमी झाली, पण आर्थिक विषमतेची दरी किती कमी झाली? देशाच्या विकासाचे मूल्यमापन केवळ राष्ट्रीय उत्पन्न, परकीय गुंतवणूक किंवा मोठ्या उद्योगांच्या वाढीवरून करता येत नाही. त्या विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत किती पोहोचला, सामान्य कुटुंबाचे उत्पन्न किती वाढले आणि त्याच्या जगण्यातील अनिश्चितता किती कमी झाली, यावरही विकासाचे खरे मोजमाप ठरते.

गरिबीच्या आकडेवारीत सकारात्मक बदल जागतिक बँकेच्या २०२६ मधील भारताच्या विकासविषयक अहवालानुसार, २०११-१२ ते २०२३-२४ या कालावधीत मध्यम उत्पन्न असलेल्या देशांसाठी वापरल्या जाणाऱ्या गरिबीच्या निकषाखालील भारतीय लोकसंख्येचे प्रमाण ५७.७ टक्क्यांवरून १६.१ टक्क्यांपर्यंत घटले. त्याच कालावधीत अत्यंत गरिबीचे प्रमाण २७.१ टक्क्यांवरून २.६ टक्क्यांपर्यंत खाली आले. ही आकडेवारी देशाने गरिबीविरोधातील लढाईत केलेल्या प्रगतीचे महत्त्व अधोरेखित करते. सामाजिक सुरक्षा योजना, अन्नधान्य वितरण, ग्रामीण रोजगाराच्या संधी, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि आर्थिक विकास यांचा या बदलात महत्त्वाचा वाटा आहे. मात्र, गरिबीच्या एका विशिष्ट निकषाच्या वर गेलेले कुटुंब आर्थिकदृष्ट्या सुरक्षित झालेच, असे म्हणता येत नाही. उत्पन्नातील थोडीशी घट, आजारपण, रोजगार गमावणे किंवा शेतीचे नुकसान यामुळे हेच कुटुंब पुन्हा आर्थिक संकटात सापडू शकते. त्यामुळे गरिबी घटल्याच्या आकडेवारीकडे समाधानाने पाहताना आर्थिक सुरक्षिततेचा प्रश्नही गांभीर्याने विचारात घेणे आवश्यक आहे. उत्पन्न वाढले, पण विषमता कायम देशातील आर्थिक विषमतेचा विचार करताना ग्रामीण आणि शहरी भागातील उत्पन्न व खर्चातील फरक लक्षात घ्यावा लागतो.



सुरेश मंत्री
अंबाजोगाई

केंद्र सरकारच्या २०२३-२४ च्या घरगुती उपभोग खर्च सर्वेक्षणानुसार, ग्रामीण भारतातील दरडोई सरासरी मासिक उपभोग खर्च ४,१२२ रुपये, तर शहरी भारतात तो ६,९९६ रुपये होता. ग्रामीण भागातील सर्वाधिक खर्च करणाऱ्या पाच टक्के लोकांचा दरडोई मासिक खर्च १०,१३७ रुपये, तर सर्वांत कमी खर्च करणाऱ्या पाच टक्के लोकांचा खर्च १,६७७ रुपये होता. शहरी भागात हीच तफावत अनुक्रमे २०,३१० रुपये आणि २,३७६ रुपये होती. उपभोग खर्च म्हणजे उत्पन्न नव्हे, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. तरीही या आकडेवारीतून समाजातील विविध आर्थिक स्तरांतील जीवनमानातील अंतर स्पष्ट होते. काही कुटुंबांना शिक्षण, आरोग्य, घर आणि बचतीसाठी पुरेसा पैसा उपलब्ध असताना अनेक कुटुंबांना मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठीही काटकसर करावी लागते.

महागाईचा सर्वाधिक फटका कमी उत्पन्न गटाला बसतो. कारण त्यांच्या एकूण खर्चातील मोठा हिस्सा अन्न आणि इतर आवश्यक वस्तूंवर खर्च होतो. उत्पन्न वाढले, तरी त्याच वेगाने खर्च वाढत असेल, तर प्रत्यक्ष जीवनमानात अपेक्षित सुधारणा होत नाही. कुटुंबाला मुलांच्या शिक्षणासाठी, आजारपणासाठी किंवा भविष्यातील गरजांसाठी बचत करता येत नसेल, तर त्याची आर्थिक स्थिती असुरक्षितच राहते. त्यामुळे नियमित रोजगार, महागाई नियंत्रण आणि परवडणाऱ्या सार्वजनिक सेवांना विशेष महत्त्व द्यावे लागेल. सामाजिक योजनांचे योगदान आणि मर्यादा गरिबी कमी करण्यासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचे योगदान महत्त्वाचे आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधून मिळणारे अन्नधान्य, ग्रामीण रोजगार हमी योजना, आरोग्य विमा, घरकुल योजना, शिक्षणाच्या सुविधा आणि आर्थिक समावेशनाच्या प्रयत्नांमुळे अनेक कुटुंबांना आधार मिळाला आहे. मात्र, योजनांचा लाभ प्रत्यक्ष गरजूंपर्यंत पोहोचणे, त्यासाठीची प्रक्रिया सुलभ असणे आणि लाभार्थ्यांना वेळेवर मदत मिळणे आवश्यक आहे. केवळ योजनांची संख्या वाढवून गरिबीचे निर्मूलन शक्य नाही. त्यासाठी योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि स्थानिक गरजांनुसार नियोजन करणे महत्त्वाचे आहे.

विशेषतः ग्रामीण आणि दुष्काळी भागात रोजगारनिर्मिती, जलसंधारण, सिंचन, कृषी प्रक्रिया उद्योग आणि लघुउद्योगांना प्रोत्साहन दिल्यास स्थानिक पातळीवर उत्पन्नाच्या संधी वाढू शकतात. यामुळे स्थलांतराची गरज कमी होऊन कुटुंबांची आर्थिक स्थिती अधिक स्थिर होऊ शकते. विकासाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा गरिबी कमी होणे ही निश्चितच सकारात्मक बाब आहे. परंतु विकासाचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत समान संधींच्या स्वरूपात पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि कौशल्यविकासाच्या सुविधा सर्वांना उपलब्ध झाल्यास आर्थिक विषमता कमी करण्यास मदत होऊ शकते. महिलांना रोजगाराच्या अधिक संधी, ग्रामीण युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण, शेतकऱ्यांना उत्पादनाला योग्य भाव आणि असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा मिळणे आवश्यक आहे. त्याचबरोबर लहान उद्योगांना बळकटी देणे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेत रोजगारनिर्मिती करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढत असताना सामान्य माणसाच्या जीवनातही स्थैर्य, सुरक्षितता आणि सन्मान निर्माण झाला पाहिजे. केवळ गरिबीच्या आकडेवारीत घट होणे पुरेसे नाही; गरिबी पुन्हा निर्माण होण्याची कारणेही दूर करावी लागतील. गरिबी कमी होण्याची आकडेवारी देशाच्या विकासप्रवासातील आशादायी टप्पा आहे. मात्र, आर्थिक विषमता, रोजगाराची अनिश्चितता आणि महागाई यांसारखे प्रश्न विकासाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. समाजातील काही घटक वेगाने प्रगती करत असताना मोठ्या लोकसंख्येला मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागत असेल, तर विकासाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचल्याचे म्हणता येणार नाही.

भारताला आर्थिक महासत्ता बनविण्याचे स्वप्न साकार करायचे असेल, तर गरिबी कमी करण्याबरोबरच आर्थिक विषमता कमी करणे, रोजगाराला स्थैर्य देणे आणि प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. गरिबी घटली, ही आनंदाची बाब; पण विषमता कमी झाली का, हा विकासाच्या यशाचा खरा कस आहे. विकासाचा प्रकाश समाजातील शेवटच्या घरापर्यंत पोहोचला, तरच देशाची प्रगती सर्वसमावेशक आणि टिकाऊ ठरेल.

राज्यस्तरीय अबॅकस परीक्षेत श्री शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

कडेगांव/प्रतिनिधी : –

कडेगांव तालुक्यातील चिंचणी (अं.) येथील श्री शिवाजी हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय अबॅकस परीक्षेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उल्लेखनीय यश संपादन केले.

या परीक्षेत विद्यालयाची विद्यार्थिनी आरोही रामचंद्र कुंभार हिने राज्यस्तरावर सहावा क्रमांक पटकावून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या उल्लेखनीय यशाबद्दल आरोही कुंभार हिच्यासह परीक्षेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन करून परीक्षेसाठी परिपूर्ण तयारी करून घेतल्याबद्दल अबॅकस मार्गदर्शिका सौ. प्रिया चव्हाण यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.


या यशस्वी वाटचालीसाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. तृप्ती चिटणीस व पर्यवेक्षक दिलीप कांबळे यांनी



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक प्रगतीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल पुणे पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार अरुण अण्णा लाड, गांधी एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रकाश लाड, गांधी एज्युकेशन सोसायटी समन्वय समितीचे सचिव किरण लाड, क्रांती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शरद लाड, तसेच पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व सर्व कर्मचाऱ्यांचे शाळेच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे.

दिपावली पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा



मा.माधव पाटील
उपअभियंता
जिल्हा परिषद बांधकाम विभाग कराड
ता.कराड,जि.सातारा

HM
Hotel Matoshree Executive
MAHABALESHWAR
Happy Diwali



298. Kavasji Street, Ner Union Bank Mahabaleshwar, Dist. Satara
Mob.: 9096505040/9422404030/9421565156
EMail- matoshreehotel@gmail.com

॥ एकासाठी सर्व । सर्वांसाठी एक ॥
community Builders



॥ एकासाठी सर्व । सर्वांसाठी एक ॥

Unity Builders
& Road Constructions Pvt Ltd
Surli-Karad

अब रण ऐसा होगा,फिर कभी जैसा नही होगा!

सतेज पाटीलःहसन मुश्रीफ आणि चंद्रकांत पाटलांच्या मुळेच 'गोकुळ'मध्ये शासकीय संचालक

कोल्हापूर/प्रतिनिधी:-

गोकुळ निवडणुकीनंतर कोल्हापुरातून सत्ता परिवर्तनाच बीज रोवलं गेलेलं आहे. उद्याच्या २०२९मध्ये राज्यात सत्ता परिवर्तन होणार, या परिवर्तनाची सुरुवात या कोल्हापुरच्या भूमीतून झाली आहे. तुम्ही आमची कळ काढली. आम्ही कळ काढली नव्हती. तुम्ही सुरुवात केली, आम्ही समाप्त करणार. याचना नही अब रण होगा, रण ऐसा होगा फिर कभी जैसा नही होगा असे म्हणत थेट राज्यातील सत्ता परिवर्तनाचाच इशारा सतेज पाटील यांनी दिला. कोल्हापुरात गोकुळ बचावसाठी काढण्यात आलेल्या संघर्ष मोर्चात ते बोलत होते.

सहकार सुडबुद्धीने वागत आहे. सहकार कायदा पायदळी तुडवण्याचे काम सरकार करत आहे. हे आज सिद्ध झाले आहे. गोकुळसाठी आम्ही न्यायालयीन लढाई लढली. मात्र त्यावेळी सत्तेत असणाऱ्यांनी



शासननियुक्त संचालकांना मतदानाचा अधिकार देऊ नका : जयंत पाटील

यापूर्वी सहकारी संस्थांमध्ये केवळ दोन सदस्य शासकीय होते. मात्र आता सतेज पाटलांचे गोकुळमधील बहुमत मोडण्यासाठी सरकारला ४ सदस्य लागले आहेत. देशात न्याय शिल्लक आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे. सतेज पाटील यांच्याविरुद्ध सर्व होते तरीही ते लढत राहिले. लढणाऱ्यांच्या मागे कोल्हापूर जिल्हा नेहमी उभा असतो हे आजही दिसून आले. लोकांच्या डोळ्यात येईल असे करू नये; आता चार शासननियुक्त संचालक नियुक्त करणार असाल तर करा, मात्र त्यांना मतदानाचा अधिकार देऊ नका, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी केले.

बुधवार व गुरूवार पेपर नाही

मंगळवार दि.१०/११/२०२६ व बुधवार दि.११/११/२०२६ रोजी दिवाळी पाडवा व भाऊबीजची कार्यालयाला सुट्टी असल्याने बुधवार व गुरूवारचा अंक प्रकाशित केला जाणार नाही. याची नोंद वाचक, जाहिरातदार, हितचिंतक व अंकविक्रेते यांनी घ्यावी.

-व्यवस्थापक

कोल्हापूर जिल्ह्यातील दिग्गज नेते मूग गिळून गप्प बसले होते. एकीकडे दिग्गज नेत्यांची फौज होते. तर राजू शेट्टी, गणपतराव पाटील, सत्यजीत पाटील यांनी मला संगर्षाच्या काळात साथ दिली. तुम्ही मला सोडून गेले म्हणून मी घाबरणारा नाही, असेही सतेज पाटील म्हणाले. मी समोर येऊन लढतो, तुमच्या सारखं पाठीत खंजीर खुपसत नाही, असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला.

मी साडे पाच लाख शेतकऱ्यांसाठी मैदानात उतरलो तुम्ही तुमच्या पोराबाळांसाठी निवडणूक लढवली. गोकुळसाठी पायाला भिंगरी लावून फिरलो. तुम्ही मला मी जातीवाद केला नाही. तुम्ही स्वतःचा मुलगा पडला म्हणून चारवेळा बोलला. मग अन्य जातीचे उमेदवार पडले याबाबत का बोलला नाही, असा सवालही सतेज पाटील यांनी उपस्थित केला. चंद्रकांत पाटील आणि हसन मुश्रीफ यांच्यामुळेच आज शासन नियुक्त संचालकांची संख्या वाढली आहे. हे त्यांचेच पाप आहे, असा आरोपही सतेज पाटील यांनी केला.

गोकुळ अमूलच्या घशात घालण्याचा डाव आहे, असा आरोप करत यावेळी सतेज पाटील यांनी गोकुळसाठी शासनाने नियुक्त केलेली चार संचालकांची नावे वाचून दाखवली. यामध्ये शिवाजी दिनकर आडनाईक, डॉ. प्रवीणचंद्र रंगनाथ हेंद्रे, ड. प्रशांत भगवान पाटोळे आणि कृष्णात पाटील यांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ॲड. प्रशांत भगवान पाटोळे हे सांगली जिल्ह्यातील आहेत. राज्य सरकारला कोल्हापूर जिल्ह्यात एक पात्र सदस्य मिळाला नाही का, असा सवालही त्यांनी केला.



कोल्हापूरकरांनी निर्धार केला की ते होणारच : राजू शेट्टी

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी म्हणाले की, राज्य सरकार सहकार क्षेत्रात दडपशाहीने कारभार करत आहे. एकीकडे मुख्यमंत्री म्हणतात गोकुळ हा केवळ जिल्ह्यापुरता मर्यादित विषय आहे. तर दुसरीकडे राज्य सरकार शासननियुक्त संचालक करून गोकुळवर ताबा घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र आम्ही हा डाव उधळून लावू. कोल्हापूरकरांनी निर्धार केला की ते होणारच हे यापूर्वी टोल आंदोलनात राज्याने पाहिले आहे, असेही राजू शेट्टी म्हणाले. गोकुळ ताब्यात घेऊन ते अमूलला विकण्याचा डाव आहे, असा आरोपही राजू शेट्टी यांनी यावेळी केला.



Bharati Vidyapeeth
(Deemed to be University), Pune (India)
Founder Chancellor : Dr. Patangrao Kadam
SOCIAL TRANSFORMATION THROUGH DYNAMIC EDUCATION
NAAC A++ Accredited with Grade
nirf Ranked 59th

LIMITED SEATS
UNLEMITED DREAMS
OUR PROGRAMMES

B.TECH
Computer Science, AI & ML, IT, Robotics, Chemical & others

MCA / BCA
Cloud Computing, AI & ML, Data Science, IOT, Cyber Security & others

MBA / BBA
Business Analytics, Project Management & others

LAW
LLB (3 yrs) BBA. LLB (5 yrs)
BA. LLB (5 yrs) LLM (2 yrs)

ADMISSIONS TO MBBS, MD, BDS, MDS, BAMS & BHMS PROGRAMMES THROUGH NEET

INNOVATIVE PROGRAMMES
- PHARMACY
- ARCHITECTURE
- BIOTECHNOLOGY
- VISUAL / PERFORMING ARTS
- PHYSIOTHERAPY
- PHOTOGRAPHY
- ALLIED HEALTH SCIENCES
- SUSTAINABILITY SCIENCE
- GEOINFORMATICS
- HOSPITALITY MANAGEMENT
- AUDIOLOGY & SPEECH LANGUAGE PATHOLOGY

Why BVDU ?
160+ Academic Programmes
Global Alumni Network Across 40+ Countries
Industry Recognised Skill Certifications
Dedicated Start-up Ecosystem
Strong Industry Linkages / Global Collaborations
Merit-based Scholarships

KEY RECRUITERS
TESLA amazon Capgemini Microsoft

HIGHEST PACKAGE - 64 LPA
AVERAGE PACKAGE - 10 LPA

NATIONWIDE CAMPUSES
PUNE I NEW DELHI I NAVI MUMBAI
KOLHAPUR I SANGLI I KARAD I SOLAPUR

SCAN TO APPLY
+91 70704 05006
+91 20-24407131-132
www.bvuniversity.edu.in